पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **२३/१०/२०२०** वेळ - सकाळी **११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक **२३/१०/२०२०** रोजी सकाळी **११.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/ प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०९ सप्टेंबर २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.डॉ.ऋषिकेष यशोद, (भा.प्र.से.) आयुक्त,** महिला व बाल कल्याण विभाग, पुणे व खालील काही सन्मा.सदस्य प्रत्यक्ष सभागृहात उपस्थित होते तर काही सन्मा.सदस्य व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे (ऑन लाईन पध्दतीने) सहभागी झाले होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे**
२. मा.वसंत प्रभाकर बोराटे
३. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
४. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे

या शिवाय मा.अजित पवार – अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.मनोज लोणकर, – उप आयुक्त, मा.आण्णा बोदडे – सहा.आयुक्त, मा.इंदलकर – कायदा सल्लागार, मा.गायकवाड – जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा – आयुक्त, महिला व बाल कल्याण पुणे** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.विधी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेची पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.विधी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

**मा.नगरसचिव -** मा.विधी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियम २००७ मधील नियम क्रमांक ३(१) मधील तरतुदीनुसार मा.विधी समिती सभापती पदाकरीता नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी दिलेल्या मुदतीत ( **दिनांक १९/१०/२०२० दुपारी ३.०० ते ५.०० वा**.) एक नामनिर्देशन पत्र नगरसचिव यांचेकडे दाखल झालेले आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सदरचे नामनिर्देशनपत्र परिपूर्ण असून ते छाननी करणेकामी मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहे.

**- आता छाननीची कार्यवाही करणेत येईल. –**

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा आयुक्त,महिला व बालकल्याण, पुणे** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, विधी समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** | **मा.वसंत प्रभाकर बोराटे** | **मा. चौगुले सीमा दत्तात्रय** |

मा.सभापती, विधी समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशनपत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशन पत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन पत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**- नामनिर्देशनपत्र माघारी घेणे –**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी नियमात तरतूद आहे. तथापि एकच वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी विचारणा करण्यात आली.

## - उमेदवार निवडून आल्याची घोषणा –

नामनिर्देशनपत्र माघारी घेण्याचा कालावधी संपला आहे. या कालावधीमध्ये उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब मा.सभापती, विधी समिती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या **बिनविरोध** निवड झाल्याचे मी **डॉ.ऋषिकेष यशोद, (भा.प्र.से.)** पिठासीन प्राधिकारी, विधी समिती (विशेष सभा) जाहीर करतो.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १


दिनांक - २३/१०/२०२० विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

**सही/-**
**( डॉ.ऋषिकेष यशोद, भा.प्र.से.)**
पिठासीन प्राधिकारी तथा
**आयुक्त, महिला व बालकल्याण, पुणे**
विधी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०९/२०२०
दिनांक : २३/१०/२०२०



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.